ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | DEC - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय कलेचा इतिहासः एक अभ्यास



**डॉ. लदाफ एस.के.**
**इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय,**
**औसा ता. औसा जि. लातूर .**

**प्रस्तावना :-**

स्वताःहाला आलेले अनुभव आणि त्यातुन प्राप्त झालेले ज्ञान तसेच मनातील भाव-भावना इतरापर्यंत पोहचविण्यासाठी ही प्रत्येक व्यक्तीची सहज प्रवृत्ती असते. या सहज प्रवृत्तीच्या प्रेरणेतुन जेव्हां एखादी सौंदर्यपुर्ण निर्मिती केली जाते तेव्हां त्याला कला असे म्हटले. कला निर्मितीच्या मुळाशी कलाकारांची कल्पक्ता संवेदनाशिलता आणि भावना कौशल्य हे घटक महत्त्वाचे असतात.१

दुक्कला आणि ललीत कला, असे दोन प्रकार पाडले जातात. ललित कलेला आंगिक कला सुध्दा म्हणटले जाते दृक्कलेचा उगम प्रागेतिहासीक काळातच झाला हे दर्शवणारे अनेक कलांचेही नमुने जगभरातील आश्मयुगीन गुहामधुन प्राप्त झाले आहे. त्याच प्रमाणे लोक कला आणि अभिजितकला अशा दोन परंपरा मानल्या जातात. लोक कला ही अश्मयुगीन काळापासुन आखंडितपणे चालत आलेली परंपरा आहे. या कलेतुन लोकांची अभिव्यक्ती उत्सफूर्तपना, समुहातील लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असने, त्याच बरोबर कलाशैली ही, कला निर्मितीची व प्रत्येक कलाकारांची स्वतंत्र पध्दत म्हणजे शैली असते. जेव्हां ऐखादी पध्दत परंपरेचे स्वरुप धारण करते तेव्हां ती पध्दत विशिष्ट कलाशैली म्हणुन ओळखली जाऊ लागते. प्रत्येक संस्कृती मध्ये वेगवेगळ्या कालखंडाशी आणि प्रदेशाशी निगळीत असलेल्या वैशिष्ट्यपुर्ण कला शैली विकसीत होतात. त्या शैलीच्या आधारे त्या त्या संस्कृतीमधील कलेच्या इतिहासाचा अभ्यास करता येतो. २

दृक्कलांमध्ये चित्रकला आणि शिल्पकलांचा समावेष्ट होतो. चित्रकलाही द्वविमितीच असते. जसे निसर्गचरित्र, वस्तुचरित्र, व्यक्तीचरित्र, वस्तुचे आरेखन इतयादी चित्रे रेखाटली जातात. त्यासाठी शिलाखंड, भिती , कागद, सुती, किंवा रेशमी, कापडांचे फलक मातीची भांडी, दगडशिल, या सारख्या माध्यमांचा उपयोग केला जातो. उदा. अजिंठा लेन्यातील बोधीस्तव पदमीणीची भिंती चीत्रे भारतामध्ये मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, उतराखंड, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, महाराष्ट्र इ. गुहा चित्रे असलेली स्थळे आहेत. मध्ये प्रदेशातील भिमबेटका , येथील गुहाचित्रे प्रसिध्द आहेत. भीमबेटकांचा समावेश जागतीक संस्कृतीक वारसा स्थळांमध्ये करण्यात आलेले आहे. गुहाचित्रामध्ये मनुष्यकृती प्राणी आणि कांही भौतिक आकृतीचा समावेश असतो. पुराश्मयुगात शेतीची सुरुवात होईल पर्यंतच्या काळापर्यंतच्या काळापर्यंत या चित्रांची शैती तचा विषय या मध्ये बदल होत गेलेले आढळतात. चित्रांमध्ये नवीन प्राणी आणि वनसपती याचा झालेला दिसतो. तसेच मनुष्याकृतीच्या रेखाटनाच्या पध्दतीत आणि वापरलेल्या रंगामध्ये सुध्दा फरक होत जातो. या चित्रामध्ये काळा लाल. पांढरा या सारखे नैसर्गिक द्रवयांपासुन तयार केलेले रंग वापरे असतात. त्या त्या काळातील लोकांचे त्यांच्या परिसरांसंबंधीचे ज्ञान आणि सृंस्कृतीक स्त्रोतांचा उपयोग करुन घेण्याचे तंत्रज्ञान यांचा विकास कसा होत गेला आणि यांची कल्पना चित्राद्वारे करता येऊ शकतो. ४

सोमेश्वर या चालुक्य राजाने लिहीलेल्या मानसोल्लास किंवा अभिलषितार्थचिंतामणी या ग्रंथात चित्रकांची परंपराने वर्णन केले आहे. या वरुन या परंपरेच्या प्राचीनत्वाची कल्पना येते. कटपुतल्या किंवा चित्रांच्या साहय्याने रामायण महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे चित्रकथा परंपरा होय. प्राचीन भारतीय वाडःमयामध्ये विविध कलासंबंधी विचार मांडण्यात आलेले आहेत . त्यामध्ये विविध धार्मीक पंथाचे आगमग्रंथ पुराणे आणि वास्तुशास्त्रावरील ग्रंथ या मधुन

चित्रकला शिल्पकला या संबंधीचा मंदरी बाधण्याच्या संदर्भात केलेला दिसतो. क्ष्याच प्रामणे शिल्पकला त्रिमितीय असते जसे मुर्ती, पुतळा, कलापुर्ण भांडी, आणि वस्तू शिल्पे कोरली किंवा घटवली जातता त्याच्यासाठीदगडी धातु आणि माती यांचा उपयोग केला जातो. वेरुळचे कैलास लेणे हे आखंड शिलाखंडातुन कोरलेले अद्वितीय शिल्प आहे.५

चित्रकले प्रमाणेच शिल्पकला ही सुध्दा आशमयुगील काळा इतकी प्राचीन आहे. भारतामध्ये धार्मिक प्रसंगी मातीच्या मुर्ती तयार करुन त्यांची पुजा करण्याची किंवा त्या अर्पण करण्याची प्रथा हडप्पा संस्कृतीच्या काळापासुन होते. त्याच प्रमाणेच अशोकाच्या काळातील दगडी स्तंभापासुन भारतातील कोरीव दगडी शिल्प निर्मितीला खऱ्याअर्थाने सुरुवात झाली. असे मांणले जाते. पण मध्ये प्रदेशातील सांची येथील स्तुप प्रथम अशोकाच्या काळात उभारला गेला. त्याच्या वरील सुंदर शिल्पांची सजावट मात्र नंतरच्या काळात केली गेली असावी असे मानले जाते. भारतातील शिल्पकलेचा विकास नंतरच्या काळात होत राहीला. त्याच बरोबर इ.स. च्या पहिल्या ते तिसऱ्या शतकात म्हणजे कुशान काळात मथुरा शिल्पशैली उद्यास आली. या शैलीने भारतीय मुर्ती विज्ञानाचा पाया धातला. देव प्रतीमांचा उपयोग करण्याची कल्पना कुशान नाण्यांवर प्रथम पहावयास मिळते. गुप्त साम्राज्याच्या काळात भारतीय मुर्ती विज्ञानाचे नियम तयार होऊन शिल्प कलेचे मापदंड निर्माण झाले. इ.स. नवव्या ते तेराव्या शतकात चोल राज्यांच्या अधिपत्याखाली दक्षिण भारतात. काव्य मुर्ती घडण्याची कला विकसीत झाली.६

भारतामध्ये अनेक कोरीव लेणी आहेत. कोरीव लेण्यांची परंपरा भारतामध्ये इ.स. च्या तिसऱ्या .शतकात स्थापत्य शिल्पकला सुरुवात झाली. तांत्रिकदृष्ट्या संपुर्ण लेणी हे स्थापत्य आणि कोरीव शिल्पाचे एकत्रित नमुना पहावयास मिळते. जसे प्रवेश द्वारे मुर्ती आतील खांब भिंती , छत, यावर कोरलेले चित्र काम असुन कांही लेण्यांमध्ये कांही प्रमाणात टिकुन आहेत. सध्या महाराष्अ्रातील अजिंठा आणि वेरुळ येथील लेणी होय त्याच प्रमाणे इ.स. आठव्या शतकातील भारतातील मंदिर स्थापत्य पुर्ण विकसीत झाले होते. हे महाराष्ट्रातील वेरुळ येथील कैलास मंदिराच्या भव्य रचनेवरुन सहज लक्षात येते. मध्ययुगील काळापर्यंत भारतीय मंदीर स्थापत्याच्या अनेक शैली विकसित झाल्या.७

इसलामच्या स्थापत्येनंतर वास्तुनिर्मितीला बंदी होती. खलीफ उमर यांच्या काळात प्रथम मस्जिद निर्माण झाली. मस्जिद — ए — नब्वी असे म्हणतात. नंतरच्या काळात स्पेन ,इजिप्त, आणि दक्षिण आफ्रिकेत इस्लामचा प्रसार झाल्यावर स्थापत्य केलेला महत्त्व आले. परंतु इस्लाम मध्ये स्थापत्य कलेचा प्रारंभ अरबांचा आद आणि शमुद जातीच्या कलाकारांनी बनविलेल्या स्थापत्य कलाकृतीपासुन सुरुवात झाली या स्थापत्याचे स्वरुप इराणी व रोमन कलेशी जुळलेले होते. घुमट, देवळी, (मेंहराब) व मिनार हे मुस्लिम स्थापत्याचे अंग होते. मध्ययुगीन भारतामध्ये फरोजशहा तुघलकच्या काळापासुन मकबरे त्याच्या भोवती बाग बगीचे हौद पाण्यासाठी नहरी बनविण्याची प्रथा सुरु झाली. दिल्ली जवळच्या मेहरौली यथील कुतूबमिनार आगरायेथील ताजमहल, औरंगाबाद येथील बिबिका मकबरा, बिजापुर येथील गोलघुमट या काळात घुंमटांवर विविध नक्षीकाम त्याला आकार देण्याची पध्दत आली मग चार ऐवजी सहा तर कधी आठ स्तंभावर मिनार बनवु लागलीत त्याला पष्टकोणी किंवा अष्टकोणी मिनार म्हणटले गेले. त्याच मिनाराने मोठे स्वरुप धार करुन मिनारांचा आकार स्वीकारला. जसे अष्टकोणी,पष्टकोणी, स्तंभावर घुमूटावर मंडप तयार करणे छतपडवणे म्हणुन त्याला दगडांच्या पट्यांचा आधार देणे गोलाकार बांधत जावुन निमुळतेत टोक करित त्याला गोल घुमटाचा आकार आला. स्तंभाच्या किंवा भितीच्या आतून छोटी- छोटी देवळे बनवुन त्याला विशिष्ट आकार देण्यात आला. त्यामुळे त्याच्या सौंदर्यात भर पडली. त्याला मेहराब किंवा दवळी, ही तुर्कीनंतर मुघल काळात जास्त विकसीत झाली. ८

कुतबोद्दीन ऐबक, यांनी इ.स. बाराव्या शतकात कुतूबनिमिर बांधण्यास प्रारंभ झाला. अल्तमश इ.स. तेराव्या शतकाच्या कारकीर्दीत ह्या कुतुबमिनाराचे बांधकाम पुर्ण झाले. आणि मुघल सम्राट शाहजहान यांनी त्याची बेगम मुमताज महल हिच्या समर्नार्थ ताजमहल बांधल. आणि इसनाच्या सतराव्या शतकात बांधलेल्या विजापूरचा घुमट हा गोलघुमट या अत्यंत भव्य इमारतीत 'मोंहिम्मद अलिशाह' याची कबर आहे. या इमारतीला गोल घुमट हे नाव मिळाले. या घुमटाच्या आतल्या घेरांच्य बाजुने गोल सज्जा आहे.. या सज्जात उभे राहुन कुजबुजले तर तो आवाज सर्वत्र ऐकु जातो. व जोरात टाळी वाजवली तर तिच्या प्रतीध्वनी अनेकदा घुमतो.९

कला शैलीचे उदाहरण म्हणुन मराठा चित्र शैलीचा विचार करता येईल. साधारणपणे इ.स. साताराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा चित्रशैली विकसीत होण्यास सुरुवात झाली. या शैलीतील चित्रे रंगीत असुन ती भिंती चित्रीत आणि हस्तलीखीत मधील लघु चित्रांचा स्वरुपातील आहेत. वाई, मेनवली, सातारा,या सारख्या ठिकाणी जुण्या व आड्यांमधुन मराठा चित्रशैलीतील कांही भिंती चित्रे पाहवण्यास मिळतात.१०

भारतातील ब्रिटीश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर एक नवीन स्थापत्य शैली उद्यास आली तिला इंडो-योथीक स्थापत्यशैली असे म्हटले जाते, कारण ब्रिटीश काळात बांधल्या गेल्या चर्च सरकारी कचेऱ्या मोठ्या पदाधिकारींची

निवास्थाने रेल्वे स्टेशन या सारख्या इमारतीमध्ये ही शैली पाहवण्यास मिळते. मुंबईचे छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे ट्रर्मिनल, ईमारत भारतामध्ये नदीवर बांधण्यात आलेले पूल, इ. अनेक इमारती पहावयास दिसुन येते. ११

**सारांश :**

प्राचीन भारतीय चित्रकलेच्या संदर्भात सांगोपन विचार झालेला दिसतो. त्यामध्ये ६४ कलांचा उल्लेख त्यामध्ये चित्रकेलेल्या उल्लेख आलेख्यांम किंवा आलेख्य विद्या या नावाने केलेला आहे. आलेख विद्येची षडांगे म्हणजे सहा महत्त्वाचे पैलु आहेत. त्याचा विचार प्राचीन भारतीयांनी अत्यंत बारकाईने केला होता. त्यामध्ये रुपभेद, विविध आकार प्रमाणबध्द, रचना आणि मोजमाप, भाव, प्रदर्शन, सौदर्य स्पर्श, सादृश्यता, आणि रंगाचे आयोजन याचा समावेश दिसुन येतो, त्याच बरोबर चित्रकले प्रमाणेच शिल्पकला सुध्दा ही आश्मयुगीन काळा इतकी प्राचीन आहे. दगडी हत्यारे बनविण्याची सुरुवात ही एक प्रकारे शिल्पकलेचीच सुरुवात होती. असे म्हणता येईल.भारतामध्ये धार्मिक प्रसंगी मातीच्या मुर्ती तयार करुन त्याची पुजा करण्याची किंवा त्याला अर्पण करण्याची प्रथा हडप्पा संस्कृतीच्या काळापासुन होती. ती आजतागायत बंगाल, बिहार, गुजरात,राजस्थान,अशा अनेक राज्यामध्ये अस्तित्त्वात असल्याचे दिसुन येते, त्याच बरोबर महाराष्ट्रामध्ये तयार केल्या जाणाऱ्या गणेश मुर्ती गौरीचे मुखवटे बैलपोळ्यासाठी तयार केल्या जाणारे मातीचे बैल पुर्वजांच्या स्मर्णासाठी उभे केलेले लाकडी मुखवट्यांचे खांब विरगळ , आदिवासी घरांमध्ये साठनिच्या मातीच्या काठ्या इत्यादी. एकंदरीत प्रत्येक क्षेत्रात बौधिक पातळीवर एखादी संकल्पना मांडुन ती प्रत्येक्षात उतरे पर्यंत निर्मितीचे अनेक टप्पे असतात प्रत्येक टप्यावर प्रशिक्षित आणि कुशल व्यक्तींची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असते. कला स्थापत्याचे उत्पादन करताना त्याच्या निर्मितीच्या प्रक्रिया कांही विशिष्ट्र संस्कृती परंपरांनी बांधलेल्या असतात.

**संदर्भ :-**


१. शुभांगना अत्रे, गणेश राऊत - इतिहास व राज्यशास्त्र इयत्ता दहावी प्रकाशक पाठ्य पुस्तक निर्मिती पुणे,पृष्ठ क्र. २२

२. कित्ता - पृष्ठ क्र .२३

३. कित्ता - पृष्ठ क्र .२४

४. बोरसे विनोद - इतिहास संशोध पत्रिका अंक पंधरावा पृष्ठ क्र. ७२

५. कित्ता - पृष्ठ क्र .७३

६. मिराशी वि.वि. - सातवाहण आणि पारशी क्षत्रपांचा इतिहास आणि कोरीव लेख.

७. मोंरवंचीकर रा.श्री. - सातवाहणकालीन महाराष्ट्र, पृष्ठ क्र.

८. अनीक कठारे - मराठवाड्यातील लेणी कल्पना प्रकाश नांदेड पृष्ठ क्र.

९. पठाण झेड.ए. - इतिहास संशोध पत्रिका अक १३ प्रकाश सोमनाथ रोडे. पृष्ठ क्र.

१०. कित्ता - पृष्ठ क्र .

११. शुभांगना अत्रे, गणेश राऊत - इतिहास व राज्यशास्त्र इयत्ता दहावी प्रकाशक पाठ्य पुस्तक निर्मिती पुणे,पृष्ठ क्र. २६-२८


**संदर्भ ग्रंथ :-**


देव शांताराम - पुरातन विद्या कॉन्टेनेन्टल प्रकाशन पूणे,

दळवी दाऊद - लेणी महाराष्ट्राची , प्रकाशन दादर , मुंबई

अनिल कठारे - मराठवाड्यातील लेणी कल्पना प्रकाशन नांदेड

पाठक स.पा. - महाराष्ट्र गॅझेटीयर स्तापथ्य कला मुंबई

सांकलिया ह.धी, श्री.म.माटे - महाराष्ट्र पुरातत्त्व संस्कृतीक मंडळ पुणे.

मोरवंचीकर रा.श्री. - सातवाहन कालीन महाराष्ट्र प्रतिभ्रा प्रकाशन पुणे,